अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार दि. ३ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ३७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## हातातून निसटणारा सामना भारताने फिरवला, ५ धावांनी बांगलादेशवर रोमहर्षक विजय



**नवी दिल्ली** : टी२० विश्वचषक स्पर्धेतील भारत विरुद्ध बांगलादेश सामना कमालीचा रोमहर्षक झाला. दोन्ही संघाच्या खेळाडूंकडून दमदार खेळ, मग पावसाचा व्यत्यय, ओव्हर्ससह टार्गेटमध्ये बदल झाल्यानंतर अखेर भारतानं ५ धावांनी सामना जिंकला आहे. त्यामुळे अगदी रोलरकोस्टर राईडप्रमाणे झालेला सामना अखेर भारताच्या बाजूने झुकला. आधी फलंदाजी करत भारतानं १८४ धावा स्कोरबोर्डवर लावल्या. ज्यानंतर फलंदाजीला आलेल्या बांगलादेशनं सुरुवात चांगली केली. सलामीवीर लिटन दासनं एकहाती सामना बांगलादेशला जिंकवण्याचा संपूर्ण प्रयत्न केला, पण केएलनं केलेनं ८ व्या षटकांत केलेल्या एका थरारक थ्रोनं दासला धावचीत केलं आणि तिथून सामना फिरला. पाऊस थांबल्यावर डकवर्थ लुईस मेथडनुसार बांगलादेशला १६ षटकात १५१ धावा करायच्या होत्या. पण भारतीय गोलंदाजांनी केलेल्या भेदक गोलंदाजीमुळं १६ षटकात बांगलादेश १४५ धावाच करु शकला आणि ज्यामुळं भारतानं ५ धावांनी जिंकला.

## ऑक्टोबरपर्यंत पावसामुळे २५ लाख हेक्टर जमिनीचे नुकसान

# शेतकऱ्यांना वाढीव दराने मदतीची मुख्यमंत्र्यांची घोषणा

सुराज्य/सोलापूर

राज्यातील शेतकऱ्यांना पावसामुळे झालेल्या नुकसानभरपाईपोटी आत्तापर्यंत ४७०० कोटी रुपयांची वाढीव दराने मदत दिल्यानंतर आता ऑक्टोबर २०२२ मध्ये झालेल्या पावसाने झालेल्या नुकसानीसाठीसुद्धा मदत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयावर शिक्कामोर्तब केला आहे. यामुळं हजारो शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

ऑक्टोबरमध्ये पावसामुळे राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे २५ लाख हेक्टर जमिनीचे नुकसान झाले आहे. आजपर्यंत कधीही सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जात नव्हती. मात्र आमच्या सरकारने प्रथमच अशा शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता दिलासा देण्याचा निर्णय घेतला असून यासाठी सुमारे ७५० कोटी रुपये इतके वाटप करण्यात आले आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेला सततचा पाऊस आणि नुकसानीसाठी हेच निर्णय लागू करण्यात येणार आहेत.



महसूल आणि कृषी विभागाला निर्देश : आम्ही महसूल आणि कृषी विभागाला निर्देश दिले होते, त्याप्रमाणे सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेगाने सुरू असून यासंदर्भात प्रशासनाला सूचना दिल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे या शेतकऱ्यांचे पंचनामे लवकरात लवकर संपावावेत असे निर्देश देण्यात आले आहेत म्हणजे त्यांना मदत करता येईल.

### ■ शेतकऱ्यांना आतापर्यंत सुमारे ४७०० कोटींची मदत

दरम्यान मदत व पुनर्वसन विभागाने माहिती दिल्याप्रमाणे जून-जुलै पासून सुरू असलेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या ४० लाख १५ हजार ८४७ शेतकऱ्यांना सुमारे ४७०० कोटींची मदत करण्यात आली आहे. ही मदत एनडीआरएफच्या निकषापेक्षा दुपटीने जास्त व दोन ऐवजी तीन हेक्टरअशी वाढीव आहे.

### ■ शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात

या पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. लवकर याबाबत विहित नमून्यात शासनास निधी मागणीचे प्रस्ताव प्राप्त होतील. शासन शेतकऱ्यांच्या प्रति संवेदनशील असून मंत्रिमंडळाने आज झालेल्या बैठकीत या शेतीपिकांच्या नुकसानीची दखल घेण्यात आली. ऑक्टोबर २०२२ मधील या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता देखील राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दुप्पट दराने ३ हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देण्याचे शासनाकडून आश्वासित करण्यात येत आहे.

## चारे येथे पैशाच्या वादातून सळईने मारहाण; पिता-पुत्रावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पैशाच्या वादातून सळई आणि हाताने केलेल्या मारहाणी दत्तात्रय एकनाथ जगदाळे वय ५१ आणि त्यांचा मुलगा अनिकेत (रा.चारे) हे दोघे जखमी झाले. ही घटना सोमवारी घडली. त्यापैकी अनिकेत याच्या हाताचे बोट फ्रॅक्चर होऊन तो गंभीर जखमी झाला.

या प्रकरणात बार्शी तालुक्याच्या पोलिसांनी वैभव लोंढे आणि त्याचे वडील बाबासाहेब गणपती लोंढे (रा.चारे ता. बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. जगदाळे यांनी त्यांच्या शेतात मे महिन्यात लोंढे यांच्या ट्रॅक्टरने नांगरणी केली होती.

त्यावेळी डिझेल पुरते पैसे दिले देऊन उर्वरित पैसे पीक निघाल्यानंतर देण्याचे ठरले होते. मात्र लोंढे पिता-पुत्राने सोमवारी आत्ताच्या आत्ता पैसे द्या असे म्हणत त्यांना मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार मंगरूळे पुढील तपास करीत आहेत.

## ६ हजाराची लाच घेताना कोषगार कार्यालयातील महिला लिपीक अँटीकरप्शनच्या जाळ्यात

सुराज्य/सोलापूर

वडिलांच्या निधनानंतर आईस मिळणाऱ्या फॅमिली पेन्शनचे बिल वेळेत काढून देण्यासाठी ६ हजार रुपयाची लाच घेताना जिल्हा कोषागार कार्यालयातील महिला लिपिक अश्विनी देविदास बडवणे (वय ३४ रा.२१ सिद्धेश्वरनगर सैफुल, विजापूररोड,सोलापूर) हिला अॅन्टीकरप्शनला पथकाने रंगेहात पकडले. ही कारवाई बुधवारी सायंकाळच्या सुमारास कोषागार कार्यालयात घडली.



या घटनेतील तक्रारदार यांचे वडील २०२१ साली निधन पावले. त्यांच्या आईस मिळणाऱ्या फॅमिली पेन्शनचे बिल वेळेत मिळण्याकरिता त्यांनी कोषागार कार्यालयात अर्ज केला होता. ते काम करून देण्यासाठी महिला लिपिक अश्विनी बडवणे हिने ६ हजाराची लाच मागितली होती.दरम्यान तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाशी संपर्क साधून तक्रार नोंदवली होती. ठरल्या प्रमाणे तक्रारदाराने काल मंगळवारी दीड हजार रुपये तिला अॅडव्हॉन्स त्यांना दिले होते. उर्वरित ४ हजार ५०० रुपये आज बुधवारी देण्यासाठी तक्रारदार कार्यालयात गेले होते.ती लाचेची रक्कम बिल रजिस्टर मध्ये ठेवण्यास अश्विनी हिने सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदाराने लाचेची रक्कम रजिस्टर मध्ये ठेवली. ती रक्कम घेत असताना लाचलुचपतच्या पथकाने अश्विनी बडवणे हिला रंगेहात पकडले आणि तिच्याविरुद्ध सदर बाजार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात केला. ही कारवाई अँटिकरप्शनचे उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, उमाकांत महाडिक, महिला हवालदार अर्चना स्वामी, हवालदार प्रमोद पकाले, उमेश पवार आणि शाम सुरवसे आदींनी केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सगळा फराळ संपला, आता येरे माझ्या मागल्या!!

| कल्याण |
|---|
| 479-02-156 |

| मेन बाजार |
|---|
| 288-82-237 |

## मराठा विद्यार्थ्यांना ६० हजार वार्षिक भत्ता

**मुंबई** : मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागाच्या निकषानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे वर्षाला ६० हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी दिली. ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख इतक्या मर्यादेत आहे अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या योजनेंतर्गत अभ्यासक्रम आणि शैक्षणिक साहित्य यासाठी ५० हजार रुपये देण्यात येणार आहे.


